प्रति,

मा.पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य मुंबई.

जा.क्र.:- पोअधी/तां.सेवा./गुअवि/३८९/२०२०          पुणे, दिनांक १०/१२/२०२०

विषय :- माहे नोव्हेंबर २०२० मधील श्वान पथकाचे उल्लेखनीय कामगिरीबाबत...

**********

उपरोक्त विषयास अनुसरून सविनय सादर की, माहे नोव्हेंबर २०२० मधील श्वान पथकाची उल्लेखनीय कामगिरी खालील प्रमाणे आहे.

१) सिंधुदूर्ग जिल्हा कुडाळ पोलीस स्टेशन गु.र.नं.२१६/२०२० भा.द.वि. कलम ४५४, ३८० हा गुन्हा दि.०४/११/२०२० रोजी ०९:०० ते १३:४५ च्या दरम्यान मौजे माणगाव तळीवाडी येथे गुन्हा घडला आहे. सदर गुन्हयामध्ये घटनास्थळाची पाहणी केली असता संशयीताने हाताळलेल्या कपाटाच्या ड्रॉवरचा वास श्वान 'रॅम्बो' यास दिला असता श्वान फिर्यादीचे मुख्य दरवाजातुन बाहेर पडून उजवीकडे वळून अंदाजे १० मीटर अंतर जात एका घराचे दिशेने आत गेला. श्वान 'रॅम्बो' यास पुन्हा मुळ घटनास्थळी आणुन वास दिला असता श्वान 'रॅम्बो' पुन्हा त्याच घराच्या आतिल परिसरात घुटमळू लागला.

त्यानुसार कुडाळ पोलीस स्टेशन यांनी केलेल्या गुन्हयाच्या तपासामध्ये संशयीत आरोपी आनंद चिपकर, रा.माणगाव, तळीवाडी हा निष्पन्न झालेला असून त्याचेकडून चोरीस गेलेला मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे.

२) सिंधुदूर्ग जिल्हा सिंधुदूर्गनगरी पोलीस स्टेशन गु.र.नं.४१/२०२० भा.द.वि. कलम ४५४, ४५७ ३८० हा गुन्हा दि.१४/११/२०२० ते दि.२१/११/२०२० रोजी २२:३० ते १६:३० च्या दरम्यान मौजे पोलीस वसाहत, सिंधुदर्गनगरी येथे गुन्हा घडला आहे. सदर गुन्हयामध्ये घटनास्थळाची पाहणी केली असता संशयीताने हाताळलेल्या दागीन्यांच्या बॉक्सचा वास श्वान 'मायलो' यास दिला असता श्वान 'मायलो' हा दुस-या मजल्यावरुन खाली येवुन इमारतीच्या मुख्य दरवाजातुन बाहेर पडून डावीकडे इमारत क्रं.८ च्या समोरुन मुख्य रस्त्यावर बाहेर पडून गणेश मंडपाच्या समोरील रस्त्याने पुढे जावून गणेश मंडपाच्या समोरील रस्त्यावर येवून थांबला.

त्यानुसार सिंधुदूर्गनगरी पोलीस ठाणे यांनी केलेल्या गुन्हयाच्या तपासामध्ये संशयीत आरोपी ओमकार राजू माळगी, वय २२, रा.पोलीस वसाहत सिंधुदूर्गनगरी हा निष्पण्ण झालेला असून सदर गुन्हयामध्ये त्याचेकडून सिंधुदूर्गनगरी पोलीस ठाणे यांनी अटक करून त्याचेकडून चोरीस गेलेला मुद्देमाल ताब्यात घेतलेला आहे.

३) सातारा जिल्हा, फलटण शहर पोलीस स्टेशन, गु.र.नं. ३५५/२०२० भा.द.वि. कलम ३०२ हा गुन्हा दि.०२/११/२०२० रोजी ०६:३० च्या सुमारास फलटण एस.टी.स्टँण्ड येथे जुना बारामती एस.टी.स्टॅण्ड येथे घडला आहे. सदर गुन्हयामध्ये घटनास्थळी एक फिक्कट निळया रंगाची ADIN CLASSIC १० CM असे लिहलेली अंडरवेअर मिळून आली. घटनास्थळाचे समोरील मोकळया डांबरी जागेवर तपासी अंमलदार यांनी ०६ लोकांना एका रांगेत उभे केले व त्यानंतर श्वान 'वीर'

यास नमुद अंडरवेअरचा वास देवून संशयीतांचे दिशेन सोडले असता श्वान 'वीर' याने रांगेत उभे असलेल्या पहिल्या व दुस-या व्यक्तींचा वास घेवुन पुढे जावून तिस-या व्यक्तींचा वास घेवून थांबला व पुढील तीन व्यक्तींचा वास घेवून पुन्हा वळून माघारी येवून तिस-या नंबरला उभे असलेल्याच संशयीत व्यक्तीच्याच जागी येवून थांबला व त्याच्या अंगावर उडया मारुन जागीच भुंकू लागला.

तपासी अधिकारी यांनी सदर संशयीत व्यक्तीकडे अधिक तपास केला असता घटनास्थळी मिळून आलेले आर्टिकल हे संशयीत व्यक्तीचेच असल्याचे निष्पन्न झाले.

४) परभणी जिल्हा, मानवत पोलीस स्टेशन, गु.र.नं. ३८/२०२० सी.आर.पी.सी. १७४ हे मयत दि.०६/११/२०२० रोजी दाखल असून मानवत पो.स्टे. इरळद येथील मिसींग महीला रेणुका भारत पवार, वय २५ वर्ष ही महीला मागील २४ तासापासुन बेपत्ता होती सदर मिसींग महीलेचा शोध हा पो.स्टे. मानवत येथील अधिकारी/कर्मचारी व इरळद येथील गावकरी यांनी मिळुन घेतला असता सदर महीला मिळून आली नसल्यामुळे श्वान पथकास बोलावण्यात आले. तपासी अधिकारी यांनी सदर मिसींग महीलेची वापरती चप्पल ही लिंबाचे झाडा खाली आढळून आली आहे त्यावरून श्वान 'जॉनी' यास सदर चप्पलचा वास दिला असता श्वान 'जॉनी' हा एका बांधाने अंदाजे एक कीलो मीटर वर असलेल्या विहीरी पाशी जावून घुटमळून भुंकत होता. त्यावर तपासी अधिकारी यांनी सांगीतले की यात मिसींग असलेल्या महीलेचा ०२ वर्षाचा मुलगा याच विहीरीत मिळुन आला आहे परंतु मिसींग महीला मिळुन आलेली नाही असे सांगीतलेवरून परत श्वान 'जॉनी' यास चप्पलचा वास दिला असता श्वान विहीरीपासून त्याच लिंबाचे झाडाला चक्कर मारून परत विहीरीकडे वापस आला यावरून दाट शक्यता निर्माण झाल्याने विहीरीतील पाणी चार मोटार लावून उपसण्यात आले व सदर मिसींगी महीला रेणुका भारत पवार यांचा मृतदेह सापडला.

५) परभणी जिल्हा, कोतवाली पोलीस स्टेशन, गु.र.नं.३५८/२०२० भा.द.वि.कलम ३०२, ३४ हा गुन्हा दि.१७/११/२०२० रोजी दाखल आहे. यातील तपासी अधिकारी यांनी सांगीतलेवरुन मयताच्या डोक्यात मारलेले विटाचे श्वानास वास देण्याचे आदेशीत केल्यावरुन श्वानास मयताचे बाजुस पडलेल्या विटाचा वास श्वान 'पंच' यास वास दिला असता श्वान 'पंच' हा मयतापासून अंदाजे ५० मिटर अंतरावर जावून मोकळे मैदानात भुंकत होता विचारपुस केली असता मयताचे व त्याचे पत्नीचे याच ठिकाणी भांडण झाले होते असे समजले त्यावरुन तपासी अधिकारी यांनी मयताचे पत्नीची चौकशी केली असता मयताचे पत्नीने गुन्हा केल्याची कबुली दिली.

६) पुणे ग्रामीण जिल्हा, शिरूर पोलीस स्टेशन, गु.र.नं. ६३९/२०२० भा.द.वि. कलम ३२६, ३५४ हा गुन्हा दि.०३/११/२०२० रोजी २१:०० वा. सुमारास मौजे न्हावरा गावचे हद्दीत चार टॉवर जवळ घडला आहे. घटनास्थळी जखमी महीला मुक्ता राजू चित्रे या नैसर्गिक विधीसाठी गेल्या असता एक अनोळखी माणसाने त्या महिलेची छेडछाड केली त्यावेळी तिने आरडाओरडा केल्याने अनोळखी माणसाने कशानेतरी डोळ्यावर फटका मारला असता सदर महिलेचा एक डोळा बाहेर पडला त्यानंतर सदर आरोपी त्या ठिकाणावरुन पळून गेला. पुढे एका गावात सदर महिलेने केलेल्या वर्णनावरुन तो एका दाढीच्या दुकानात दाढी करण्यास आला होता असे समजले, परंतु त्या ठिकाणावरुन तो निघून गेला सदर दुकानात त्याचा रुमाल तो तिथेच

विसरला सदर रूमालाचा वास श्वान 'सिबा' हीस दिला श्वानाने ५ ते ६ कि.मी. अंतराचा माग काढला तसेच आरोपी ज्या ज्या ठिकाणी फिरला त्या ठिकाणी श्वानाने अचूक मार्ग काढला. सदर इसमास तेथील आजूबाजूचे लोकांनी देखील बघीतलेले होते व लोकांनी देखील नंतर सांगीतले की श्वान जेथे जेथे गेला तेथे तेथे आरोपी येवून गेला असल्याचे सांगीतले. त्यावरून सदर इसमास अटक करण्यात आली.

७) नाशिक शहर जिल्हा, इंदीरानगर पोलीस स्टेशन, गु.र.नं. ३०६/२०२० भा.द.वि. कलम ३०२ हा गुन्हा दि.११/११/२०२० रोजी इंदीरानगर, पो.स्टे. हद्दीत घडला आहे. घटनास्थळावरील लोखंडी रॉड व इतर वस्तुंचा वास श्वान 'गुगल' यास देवुन सोडले असता श्वान 'गुगल' वास घेत गुरूकृपा गॅरेजच्या फोरव्हीलर पार्कींगच्या जवळ जावुन एकाच जागेवर जावुन घुटमळून थांबला. त्यानंतर वरिष्ठांनी गॅरेज मध्ये काम करणारे कामगारांची चौकशी केली असता सदर ठिकाणी एक चॉकलेटी रंगाची गाडी नं.एम.एच.१५ बी.एफ. ७१९ ही गाडी कामासाठी आली होती व ती गाडी सध्या जागेवर नसल्याचे माहिती मिळाली. सदर गाडीचा शोध घेतला असता गाडी येवला नाशिक या ठिकाणी संशयीत इसम नामे १) राकेश सुभाष कोटकर २) सुभाष भगवान लभडे रा.निमगाव मोड, ता.येवला, जि.नाशिक यांच्या ताब्यात मिळून आल्याने त्यांना ताब्यात घेवुन चौकशी केली असता त्यांनी गॅरेज मालक रामचंद्र रामपराग निशाद, रा.नाशिक यांच्याबरोबर पैशांच्या वादातुन झालेल्या झटापटीत रागाचे भरात लोखंडी रॉड गॅरेज मालकाच्या डोक्यात मारून सदर ठिकाणी उभी असलेली चॉकलेटी रंगाची गाडी नं.एम.एच.१५ बी.एफ. ७१९ ही घेवुन पळून गेल्याची कबुली दिली आहे.

अशा प्रकारे खूनाचे ०३, घरफोडीचे ०२, दुखापतीचा ०१ व मनुष्य मिसींगचा ०१ असे एकुण ०७ गुन्हे माहे नोव्हेंबर मध्ये श्वान पथकांचे मार्फतीने उघडकीस आलेले असून सन २०२० मध्ये आजवर एकुण ५७ गुन्हे श्वान पथकांचे कामगिरी मुळे उघडकीस आलेले आहेत.

करिता माहितीस्तव सविनय सादर.

(प्रविण साळुंके)
प्रभारी अपर पोलीस महासंचालक
राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, म.राज्य पुणे.

Hc Vengurlekar Sindhudurg Dog Unit




श्वान पथक सिंधुदुर्ग, श्वान मायलो,श्वानहस्तक पोलीस नाईक/ 726 चंद्रशेखर सुभाष मोरजकर आणि पोलीस अंमलदार 563/ निखिल विनोद चव्हाण

18:30



Hc Vengurlekar Sindhudurg Dog Unit




श्वानपथक सिंधुदुर्ग, श्वान रॅम्बो, पोलीस नाईक/ 445 अमित गोविंद वेंगुर्लेकर आणि पोलीस नाईक/ 1054 सुमित सुहास देवळेकर

17:01